मार्गदर्शन

# पाचटात लावा शेवगा



आशुतोष चिंचोळकर
(मो.नं. ९१४६९६६२२२)
कृषिमित्र, यवतमाळ





पाचटात किंवा पसरलेल्या पानांसारख्या अवशेषांत शेवग्याची लागवड करताना, नेहमीप्रमाणे शिफारस केलेल्या अंतरावर खड्डा खोदावयाची गरज नाही. ठिबकचे लॅटरल व दोन ड्रिपरमधील अंतर लक्षात घेऊन ड्रिपरजवळील गरजेएवढे पाचट/ पाने बाजूला करावी. ३०० ग्रॅम एस.एस.पी. शेणखतात मिसळून, शेवग्याच्या पिशवीतील रोपांच्या बुडाकडील भागाचा विचार करून ड्रिपरजवळ योग्य आकाराचा खड्डा घेऊन अगोदर मिश्रण टाकावे. पॉलिथिन पिशवी बाजूला काढून त्यावर रोपांची लागवड करावी.

व्यापारी शेती करण्यासाठी सतत हातात पैसा खेळत राहिला पाहिजे. जादा साठवण क्षमता असलेले, कीड- रोगांना सहनशील तसेच उत्पादन खर्च कमी करणाऱ्या तंत्रज्ञानाची जोड दिली तर प्रतिकूल स्थितीतही शेती व्यवसाय नफ्यात राहील. अशा प्रकारच्या पीक निवडीमध्ये शेवगा पिकास प्राधान्य द्यावे. ऊस/ केळीचे खोडवा पीक काढल्यांनतर आहे त्या ठिबक सिंचनाचा वापर करून शेतीची कोणतीही मशागत न करता शेवग्याची लागवड केली तर अधिक नफ्याबरोबर जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होईल.

**जमीन व हवामान** : ऊस/ केळी ज्या जमिनीत येतात त्या, म्हणजे ज्या जमिनीचा सामू ६.०० ते ७.५ आहे अशा जमिनीत शेवगा लागवड करण्यास हरकत नाही. चिबड व चुनखडीयुक्त जमिनीत शेवग्याची लागवड करु नये. शेवगा हे बहुवार्षिक पीक आहे. शेवग्याचे झाड अत्यंत काटक असून सर्व प्रकारच्या हवामानात चांगल्या प्रकारे येते. सम व दमट हवामान शेवग्याच्या वाढीला चांगले मानवते. २५ ते ३० अंश से. तापमान झाडासाठी योग्य आहे. को-१ , को-२ , जी.के.व्ही.के.- १,२,३, पी.के.एम- १ , कोकण रुचिरा हे शेवग्याचे सुधारित वाण आहेत .

**लागवड** : पाचटात किंवा पसरलेल्या पानांसारख्या अवशेषांत शेवग्याची लागवड करताना, नेहमीप्रमाणे शिफारस केलेल्या अंतरावर खड्डा खोदावयाची गरज नाही. ठिबकचे लॅटरल व दोन ड्रिपरमधील अंतर लक्षात घेऊन ड्रिपरजवळील गरजेएवढे पाचट/ पाने बाजूला करावी. ३०० ग्रॅम एस.एस.पी. शेणखतात मिसळून, शेवग्याच्या पिशवीतील रोपांच्या बुडाकडील भागाचा विचार करून ड्रिपरजवळ योग्य आकाराचा खड्डा घेऊन अगोदर मिश्रण टाकावे. पॉलिथिन पिशवी बाजूला काढून त्यावर रोपांची





लागवड करावी. लागवड करण्यापूर्वी ३-४ तास ठिबक चालवावे (पिशवीत जी रोपाची स्थिती होती तीच जमिनीत लावताना असावी.) लागवड केल्यानंतर माती चारी बाजूने पायाने दाबावी आणि ठिबक सिंचन अर्धा तास चालवावे. रोपे खात्रीच्या रोपवाटिकेतून निरोगी, योग्य वयाची खरेदी करावी. जर रोपे खरेदी करावयाची नसतील तर ४०-६० सें.मी. लांबीचे फाटे (मागील हंगामातील) लागवडीसाठी वापरता येतात. लागवडीच्या वेळेस एका ठिकाणी २-३ फाटे लावावेत व लावतेवेळी १५ सें.मी. भाग जमिनीत गाडावा. बुडास लावणीपूर्वी छाट कलमास तिरपा काप द्यावा.

**खत व्यवस्थापन** : लागवडीनंतर ७५ ग्रॅम नत्र, ५० स्फुरद व ७५ ग्रॅम पालाश अशी प्रतिझाडास शिफारस आहे. याऐवजी जर आपण स्लरीच्या माध्यमातून यापैकी २५ टक्के खत दिले तरी उत्पादन व दर्जा चांगला मिळू शकतो. पहिल्या वर्षी फॉस्फेट शेणखताबरोबर मिसळून द्यावे. नत्र व पालाश दोन समान हप्त्यांत लागवडीच्या वेळेस व नोव्हेंबरमध्ये द्यावे. सूक्ष्म मूलद्रव्यांच्या कमतरतेची लक्षणे दिसून आली तर त्यांची फवारणी करून उत्पादनावर विपरित परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**पाणी व्यवस्थापन** : शेवगा पिकास फुले लागणीच्या वेळेस पाणी दिल्यास फुलगळ होते. ठिबकद्वारे पाणी देण्यासाठी हंगाम वाढीची अवस्था, जमिनीचा प्रकार, हवामान याचा विचार करून प्रतिदिन १६-२० लिटर पाणी प्रतिझाड द्यावे.

**आंतरमशागत** : ऊसाचे पाचट असल्यामुळे तणांचे नियंत्रण नैसर्गिकरित्या होते. लागवड केल्यानंतर झाडाला योग्य आकार देणे आवश्यक आहे. व्यवस्थित आकार दिला नाही तर झाड उंच वाढते, त्यामुळे शेंगा काढणे अवघड

जाते. यासाठी लागवडीनंतर चार महिन्यांनी पहिली छाटणी करावी. यावेळी जमिनीपासून एक मीटर अंतरावर खोड छाटावे आणि चार दिशांना चार मुख्य फांद्या वाढू द्याव्यात. यामुळे झाडाची उंची कमी होऊन शेंगा काढणे सोपे जाईल. त्यानंतर सात ते आठ महिन्यांनी चारी फांद्या खोडापासून १ मीटर अंतरावर छाटाव्यात, यामुळे झाडाचा मुख्य सांगाडा तयार होईल. झाडाची उंची कमी होऊन शेंगा काढणे सोपे जाईल व उत्पादन वाढेल. झाड जसजसे जुने होईल तसतशी दर दोन वर्षांनी एप्रिल– मे महिन्यांत शेंगा निघाल्यावर छाटणी करावी; म्हणजे झाड नियमित उत्पादन देईल. साधारणपणे ५ मीटर व त्यावरील अंतरावरील फळझाडांमध्ये शेवगा हे आंतरपीक म्हणून घेता येते. तसेच शेवगा पहिल्या वर्षापासूनच उत्पादन देत असल्यामुळे याच्या आंतरपिकामुळे मुख्य फळझाड लागवड व फळधारणेपर्यंतच्या जोपासनेचा खर्च सहजपणे शेतकऱ्यास मिळतो.

**अधिक उत्पादनासाठी :** ज्या जातींना लागवडीनंतर सहा महिन्यात फुलधारणा होते, अशा झाडांना भरपूर शेंगा लागाव्या असे वाटत असल्यास, झाडे ४–५ महिन्यांची झाल्यानंतर पाण्याचा योग्य ताण देणे आवश्यक आहे. त्यामुळे फुलधारणा भरपूर प्रमाणात होते. परागीकरणाअभावी शेंगा फारशा लागत नाहीत, त्यासाठी मधमाश्यांची पेटी बागेत ठेवणे गरजेचे आहे. तसेच आंतरपीक म्हणून झेंडूची लागवड केल्यास मधमाश्या मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन जादा परागीकरण होऊन शेवगा उत्पादनात वाढ होते. परागीभवनाअभावी मादी फुलांची गळ होऊन नर फुलांपासून तयार झालेल्या भेंडीच्या आकाराच्या व बिया नसलेल्या चवहीन शेंगा जास्त लागल्याचे चित्र आपणास पहावयास मिळते. साधारणपणे ८–१० वर्षे व्यवस्थित व्यवस्थापन केले तर चांगले उत्पादन मिळू शकते. पहिले पाचट कुजल्यानंतर दोन ओळींत व झाडांतील जागेत धैंचा किंवा बोरु पेरून फुलोऱ्यापूर्वी



कापून त्याचे आच्छादन करावे व ही प्रक्रिया सलग ८–१० वर्षे करावी .

**रोग व कीड नियंत्रण :** या पिकावर रोगांचा प्रादुर्भाव फारसा होत नाही. परंतु काही वेळा जून ते ऑगस्ट महिन्यांत पानांची गळ होते. खोड व फांद्यांवर ठिपके किंवा चट्टे दिसतात, रोपे मरतात. या रोगाच्या नियंत्रणासाठी बाविस्टिन १० ग्रॅम – १० लि. पाणी किंवा बोर्डो मिश्रण ०.२५ टक्के फवारावे. शेवग्याच्या झाडास खोड व फांद्या पोखरणाऱ्या आणि पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव होतो. अळ्या खोड पोखरून आत शिरतात, त्यामुळे झाड कमकुवत होऊन



उत्पादन कमी मिळते. प्रादुर्भाव झालेल्या झाडाच्या बुंध्याजवळ अळीने बाहेर काढलेला भुसा दिसून येतो. अशा छिद्रात कापसाचा बोळा नुवॉन या औषधात बुडवून घालावा व छिद्राचे तोंड चिखलाने किंवा शेणाने बंद करून घ्यावे. पाने गुंडाळणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.

**काढणी व उत्पादन :** छाट कलमापासून लागवड केल्यास वर्षाच्या आत तर रोपे वापरून लागवड केल्यास १२ ते १८ महिन्यांनी शेंगा मिळू शकतात. पूर्ण वाढीच्या आणि ज्यांचा पीळ पूर्ण उलगडला आहे, अशा शेंगा लांबीनुसार जुळवून घ्याव्यात. नंतर ओल्या गोणपाटावर गुंडाळल्यास शेंगांचा तजेला जास्त काळ टिकून रहातो. एका वर्षानंतर दरवर्षी प्रत्येक चांगल्या झाडापासून सुमारे २५ ते ५० कि.ग्रॅ. शेंगा मिळतात. ■